अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

# अपुऱ्या पोलिसांमुळे गुन्हेगारांच्या संख्येत वाढ

देशाच्या सुरक्षिततेचा प्रश्न नेहमीच चर्चीला जातो. परंतु सरकारकडूनच याबाबत कशी हेळसांड होते याचे चित्र समोर आले आहे. गेल्याच आठवड्यात देशाचे संरक्षण करणाऱ्या तीनही दलांमध्ये सुरक्षिततेच्या विविध मुद्दांवक्षुन कसा समन्वय नाही याची माहिती बाहेर आली होती. भूदल, नौदल, वायुदल या तीनही संस्था अधिकाधिक सुरक्षिततेसाठी स्वत: च्या अखत्यारित आणखी एक छोटी सुरक्षा व्यवस्था निर्माण करीत असते. परंतु या तीनही दलांच्या तीनही व्यवस्थांमध्ये कोणताच ताळमेळ नाही. याशिवाय तीनही दलांमध्ये पुरेसे मनुष्यबळ नसल्याचेही समोर आले आहे. आता देशातील प्रत्येक राज्यांकडे असलेली सुरक्षा व्यवस्थासुध्दा अर्धवट असल्याची माहिती समोर आली आहे. प्रामुख्याने राज्यपातळीवरची सुरक्षा व्यवस्था हाताळण्याचे काम स्थानिक पोलीस यंत्रणेला करावे लागते. पण आज संपूर्ण देशामध्ये विविध राज्य मिळून २२ लाख पोलिसांच्या जागा रिकाम्या असल्याची धक्कादायक माहिती पुढे आली आहे. त्यामध्ये गुजरातचा पहिला नंबर असून त्याठिकाणी चाळीस टक्के जागा रिकाम्या आहेत. तर महाराष्ट्रदेखील त्यामध्ये मागे नाही. ज्याठिकाणी सध्या मोठ्या प्रमाणावर जातीय दंगली होत आहेत, त्या उत्तरप्रदेशातसुध्दा एक लाख पोलिसांच्या जागा रिकाम्या आहेत. महाराष्ट्रातसुध्दा नव्याने दोन लाख नऊ हजार चारशे एकेचाळीस जागा मंजूर झाल्या असताना त्यापैकी तेरा हजार सातशे नव्वद जागा रिकाम्या आहेत. गुजरातमध्ये हीच संख्या पंचेचाळीस हजार एकशे ऐक्यान्नव आहे. त्यापाठोपाठ पश्चिम बंगालमध्ये अडोतीस हजार सातशे पंचवीस पोलिसांच्या जागा भरल्या गेल्या नाहीत. ज्या ठिकाणी नक्षलवादाचे सतत धोके निर्माण होतात त्या छत्तीसगढमध्येसुध्दा सरकारने सहासष्ठ हजार सहाशे तीस पोलीस सुरक्षा रक्षकांना मंजुरी दिली असताना वीस हजार नऊशे सोळा जागा रिकाम्या आहेत. अशा विपरित परिस्थितीत भारताची सुरक्षा व्यवस्था काम करते. यावरून आपणच आपलेच धोके कसे वाढवतो, हेही सिध्द होते. एकीकडे सर्वसामान्य नागरिकाची काळजी घेणे, सरकार किंवा पोलीस यंत्रणा अपुऱ्या पडतात. दहशतवादी किंवा समाजकंटक याच दीरंगाईचा गैरफायदा घेतात आणि आपला कार्यभाग उरकतात. धोके काय आहेत आणि ते रोखायचे कसे याचा जर गंभीरपणे विचार होत नसेल तर सुरक्षिततेच्या मुद्यावर आपण आपलीच फसवणूक करून घेत आहोत. विशेषत: सामान्य माणसाच्या जीवाची काळजी घेण्याबाबत सरकार गंभीर नाही, हेच यावरून सिध्द होते. बदलत्या परिस्थितीचा विचार केला तर जगाच्या तुलनेमध्ये भारताने अजूनही सुरक्षिततेच्या मुद्याबाबत योग्य ती उपाययोजना केली नसल्याचे म्हणावे लागेल.

### दहशतवाद्यांसाठी संधी

या देशातल्या अतिमहत्वाच्या व्यक्तींना सगळ्या प्रकारची सुरक्षा मिळते. व्हिआयपी म्हणून मिरवणाऱ्यांच्या अवतीभवती पोलीस व्यवस्थेचा गराडा असतो. पण सामान्य माणसाला आपला जीव धोक्यात घालूनच सगळीकडे वावरावे लागते. केव्हा कुठे काय होईल याचा कोणीही भरोसा देऊ शकत नाही. या अपुऱ्या पोलीस दलामुळे स्वाभाविकपणे सुरक्षा व्यवस्थेवर ताण पडतो. त्यात सामान्य माणसाबरोबर पोलीस कर्मचाऱ्यांचेही बळी जातात. आश्चर्याचा भाग असा की, यासाठी निधी उपलब्ध असताना किंवा सगळ्या कायदेशीर बाबी मंजूर झाल्या असताना जागा का रिकाम्या राहतात. याचा अर्थ एकूण समाजाच्या काळजीपेक्षा राजकारणात सत्ताधारी जास्त रस घेतात, असा निष्कर्ष यावरून काढावा लागतो. गेल्या पंधरावीस वर्षांमध्ये संपूर्ण देश दहशतवादाच्या गंभीर समस्येशी तोंड देत आहे. मुंबईवर झालेला दहशतवादी हल्ला हा या अशाच निष्काळजीपणाचा नमुना होता किंवा अजूनही काश्मिर आसाम या राज्यांमध्ये सुरू असलेल्या दहशतवादी कारवाया पोलीस व्यवस्था सक्षम नसल्याचेच दाखवून देणाऱ्या आहेत. जर सरकारने लोकसंख्येच्या तुलनेत आणि एकूण दहशतवादाचे धोके लक्षात घेऊन सुरक्षा व्यवस्था मजबूत ठेवल्या असत्या तर या कारवाया नियंत्रणात ठेवणे सोपे गेले असते. आजही मुंबई, दिल्ली, कोलकाता, बंगळुरू यासारख्या मोठ्या शहरांमध्ये लोकसंख्येच्या तुलनेत पोलीसदल कमी पडते. जवळपास एक हजार लोकांमागे केवळ आठ पोलीस अशी आज मुंबईची परिस्थिती आहे. एकीकडे मुंबईतल्या वाढत्या गुन्हेगारीची चर्चा होते, पण उपाय मात्र केले जात नाहीत. आहे त्या पोलीस दलालासुध्दा पुरेशी साधनसामुग्री दिली जात नाही. जीव धोक्यात घालणाऱ्या पोलिसांना लाईफ जॅकेट पुरेशा प्रमाणात दिले गेले नाही. आधुनिक शस्त्र किंवा वाहने देण्याबाबतही दिरंगाई सुरू आहे. अपुरे पोलीसदल आणि अपुरी शस्त्रसामुग्री कोणत्याच सुरक्षिततेची हमी देऊ शकत नाही. कोणत्याही देशाच्या किंवा राज्याच्या दृष्टीने सक्षम आणि पुरेशा संख्येमध्ये पोलीस दल तैनात असणे ही अत्यंत प्राथमिक गरज ठरते. तीदेखील पूर्ण करता येत नसेल तर राज्यकर्ते सामान्य माणसाच्या जीवाशीच खेळतात, असे म्हणण्याशिवाय पर्यायच शिल्लक राहात नाही.

### मुंबईतली वाढती गुन्हेगारी

गेल्या वर्ष दीडवर्षापासून सगळ्याच देशांमध्ये महिलांवरच्या अत्याचारांमध्ये लक्षणीय वाढ झाली. महिलांवर अत्याचार करणाऱ्यांना फाशीची शिक्षा द्यावी, अशा प्रकारची मागणी केली गेली. पण मुळात असे अत्याचार करण्याची संधी कोण देतो याचा सरकारने कधी विचार केला आहे का. अत्याचार करणाऱ्यांना कायद्याचा किंवा पोलीस यंत्रणेचा धाकच वाटत नाही. कारण पोलिसच अपुऱ्या संख्येत आहेत आणि ते या गुन्हेगारांच्या नजरेलाही पडत नाहीत. या सगळ्या गोष्टीचा निष्कर्श काढला तर अपुऱ्या पोलीस संख्येमुळेच महिलांवरच्या अत्याचारांमध्ये वाढ होत आहे, असे म्हटले तर ते गैर ठरणार नाही. आज मुंबईसारख्या महानगरात पोलिसांचा प्रभाव जाणवत नाही. मोटरसायकलवरून येणारे दोन चार गुन्हेगार सहजपणे महिलांच्या गळ्यातील सोनसाखळी पळवून नेतात. त्यांना त्याच क्षणी पकडण्यासाठी जवळपास फिरते पोलीस पथकही नसते. आणि मग अशावेळी मुंबईतल्या अनेक उपनगरांमध्ये पोलिसांनी महिलांनाच सोनसाखळी चोरांपासून सावध राहा, असे सांगणारे फलक लावून सूचना केल्या आहेत. याचा अर्थ आम्ही या चोरांना पकडण्यात असमर्थ आहोत याचीच पोलीस कबुली देतात. परंतु लोकसंख्येच्या तुलनेत जर पोलिसांची संख्या कमी असेल तर पोलिसांनाही दोष देता येत नाही. याचा अर्थ पोलिसांच्या अपुऱ्या संख्येमुळे गुन्हेगारांची संख्या वाढत असल्याचे चित्र आपोआप समोर येते. आता तर सरकारी आकडेवारीतूनच महाराष्ट्रासकट देशभरात तब्बल पंचवीस टक्के म्हणजेच बावीस लाख पोलिसांच्या जागा रिकाम्या आहेत. यावरून संबंधित राज्यांच्या गृहखात्यांनी जागे व्हायला हरकत नाही. गुन्हेगार सापडायचे तेव्हा सापडतील. परंतु पोलिसांमधल्या रिकाम्या जागा तातडीने भरल्या जाणे गरजेचे आहे.